## पश्चिम बंगालमध्ये रेल्वेचे डबे घसरून भीषण अपघात



**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये भीषण रेल्वे अपघात झाला आहे. पाटण्यावरून गुवाहाटीच्या दिशेने जाणाऱ्या बिकानेर एक्स्प्रेसला गुरुवारी (दि. १३) संध्याकाळी ५च्या सुमारास पश्चिम बंगालमधील जलपाईगुडी भागात भीषण अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार १२ डबे रूळावरून घसरले आहेत. या अपघातातील मृतांची नेमकी संख्या अद्याप समजू शकलेली नाही, पण अपघाताची तीव्रता पाहता अनेकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुरुवातीला तीन जणांच्या मृत्यूची पुष्टी करण्यात आली आहे. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. उलटलेल्या डब्यांमध्ये मोठ्या संख्येने प्रवासी अडकले असून अनेक जखमी झाले आहेत. दरम्यान, या अपघातप्रकरणी रेल्वे खात्याने उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.


शुक्रवार, १४ जानेवारी २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक १७८

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


### अंतरंग


महाराष्ट्रात कायदा-सुव्यवस्थेच्या चिंधड्या -चित्रा वाघ/२

बहुतांश कोरोना रुग्णांवर घरीच होताहेत उपचार/३

युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस व दोन साथीदारांना बेड्या/५


# ‘दिबां’चे नाव लागल्याशिवाय विमान उडणार नाही!

## ■ नवी मुंबई विमानतळ नामकरणावरून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा ठाकरे सरकारला इशारा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा. पाटील सर्वांचे बाप होते. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रासाठी संघर्ष केला आहे. त्यामुळे ‘दिबां’चे नाव लागल्याशिवाय विमान उडणार नाही, अशा शब्दांत नवी मुंबई विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दि. बा. पाटील यांचेच नाव देण्याची आग्रही मागणी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी गुरुवारी (दि. १३) केली. ते पनवेल तालुक्यातील कोल्ही कोपर येथे नवी मुंबई विमानतळ क्षेत्रात झालेल्या भूमिपुत्र निर्धार परिषदेत बोलत होते. ठाकरे सरकारला भूमिपुत्रांचे प्रश्न सोडवता येत नसतील, तर त्यांनी सत्ता सोडावी, अशी घणाघाती टीका त्यांनी राज्य सरकारवर केली, तसेच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वडिलांच्या नावाचा विचार न करता वडीलधारी ‘दिबां’चे नाव देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही ना. आठवले यांनी या वेळी केले.

लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून ‘दिबा’साहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून गुरुवारी भूमिपुत्र परिषद आयोजित करण्यात आली होती. सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेला माजी खासदार जगन्नाथ पाटील, संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार गणपत गायकवाड, आमदार महेश बालदी, माजी आमदार सुभाष भोईर, कॉ. भूषण पाटील, ‘दिबां’च्या सहकारी व कोल्हापूरच्या माजी नगरसेविका भारतीताई पोवार, माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, तसेच नंदराज मुंगाजी, संतोष केणे, गुलाब वझे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, दशरथ भगत, उपमहापौर सीता पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, राजाराम पाटील, जे. डी. तांडेल, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, सुनील म्हात्रे, रूपेश धुमाळ, सदानंद वास्कर, कांचन घरत, सुनील पाटील, प्रशांत पाटील, गोवर्धन डाऊर, के. के. म्हात्रे, सीमा घरत यांच्यासह रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर, कल्याण, डोंबिवली आदी विभागांतील भूमिपुत्र उपस्थित होते. तत्पूर्वी ‘दिबां’च्या पनवेल येथील संग्राम निवासस्थानी, जन्मभूमी जासई येथे, तसेच गावोगावी ‘दिबां’च्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या वेळी ना. रामदास आठवले यांनी बोलताना सांगितले की, ‘दिबां’चे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राहिले आहे. त्यांच्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या हिताचे अनेक निर्णय सरकारला घेणे भाग पडले आहे. ‘दिबा’ संघर्षशील नेते होते. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी गौरवशाली कार्य केले आहे. समाजाला न्याय देण्याचा त्यांचा संघर्ष सर्वांनी पाहिला आहे. त्यामुळे वाटेल ते झाले तरी चालेल, पण विमानतळाला ‘दिबां’चेच नाव लागले पाहिजे. त्यांच्या नावासाठी आरपीआयचा जाहीर पाठिंबा आहे. (पान २ वर..)

### संघर्षाच्या योद्ध्याला सलाम -भारतीताई पोवार



प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि. बा. पाटीलसाहेबांनी भूमीच्या रक्षणासाठी जन्म घेतला. सिडकोने ‘दिबां’नाही त्रास दिला, परंतु सह्याद्रीच्या दगडासारखे ‘दिबा’ कणखर होते. संघर्षाच्या योद्ध्याला सलाम करण्यासाठी मी कोल्हापूरवरून आले आहे. संघर्ष पहायचा असेल तर आगरी-कोळी यांचा पाहा असे मी पश्चिम महाराष्ट्रात सांगत असते. पश्चिम महाराष्ट्रात ‘दिबां’सारखा नेता निर्माण झाला असता तर त्या ठिकाणी प्रकल्पग्रस्तांवर बिकट परिस्थिती आली नसती. ‘दिबां’चे नाव विमानतळाला दिल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही, असे या वेळी १९८४ सालच्या गौरवशाली लढ्यातील अग्रणी महिला कार्यकर्त्या व कोल्हापूरच्या माजी नगरसेविका भारतीताई पोवार यांनी स्पष्ट केले.



*धगधगती आग भूमिपुत्रांच्या मनात आहे. दृढनिश्चय असल्याने यशस्वी झाल्याशिवाय थांबायचे नाही. ‘दिबां’चे नाव आणि भूमिपुत्रांचे प्रश्न हे प्रकल्पग्रस्तांच्या अस्तित्वाचे मुद्दे आहेत. ते सोडविल्याशिवाय शांत बसायचे नाही.*

**-लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती**



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर..

### ...तोपर्यंत क्रांतीची धगधगती मशाल शांत करायची नाही! भूमिपुत्र परिषदेत निर्धार

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दैवत, भूमिपुत्रांचे कैवारी, कष्टकऱ्यांचे असामान्य नेतृत्व, झुंजार नेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव लागलेच पाहिजे आणि तो प्रकल्पग्रस्त, स्थानिक, भूमिपुत्रांच्या जिव्हाळ्याचा अस्तित्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न जोपर्यंत मार्गी लागत नाही तोपर्यंत क्रांतीची धगधगती मशाल शांत करणार नाही, असा निर्धारवजा इशारा या भूमिपुत्र परिषदेद्वारे सिडको आणि राज्य सरकारला देण्यात आला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव लागलेच पाहिजे ही भूमिका भूमिपुत्रांनी कायम ठेवत रणशिंग फुंकले आहे. सिडको आणि राज्य सरकारनेही ‘दिबां’च्या नावाचा ठराव करून तो प्रस्ताव केंद्र सरकारला द्यावा, अशी आग्रही मागणी भूमिपुत्रांनी केली आहे. पोलीस प्रशासनाने लवकरच सिडकोसोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे. त्या अनुषंगाने भूमिपुत्रांच्या बाजूने सकारात्मक निर्णय न झाल्यास २४ जानेवारीपासून विमानतळाचे काम बंद करण्याचा निर्धार गुरुवारी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भूमिपुत्र परिषदेमध्ये पुन्हा एकदा जाहीर करण्यात आला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे यासाठी ‘दिबा’साहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून १३ जानेवारीला रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर या जिल्ह्यातील समस्त भूमिपुत्रांची ‘भूमिपुत्र परिषद’ तर २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आल्यानंतर पोलीस प्रशासनाने कृती समितीला चर्चेला बोलावले होते. कोरोना महामारीचा वाढता प्रादूर्भाव पाहता ही परिषद व आंदोलन रद्द करावे, अशी सूचना व आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले. त्याचबरोबर पोलिसांनी या प्रश्नासंबंधी सिडको व्यवस्थापकीय संचालकांबरोबर २० जानेवारीपूर्वी बैठक घेण्याचे आश्वासित केले आहे. त्यामुळे आजची भूमिपुत्र परिषद मर्यादित स्वरूपात करण्याचे कृती समितीने जाहीर केले होते. त्यानुसार ही भूमिपुत्र परिषद दिलेल्या शब्दाप्रमाणे कोरोनाचे नियम पाळून झाली, मात्र सिडको व्यवस्थापकीय संचालकांबरोबर भूमिपुत्रांच्या बाबतीत प्रश्न मार्गी न लागल्यास २४ जानेवारी रोजी काम बंद आंदोलन करण्याचा गर्भित इशारा देण्यात आला आहे.

---

### निवडक

#### मंत्री छगन भुजबळ यांच्या मुक्ततेला कोर्टात आव्हान

**मुंबई :** महाराष्ट्र सदन घोटाळाप्रकरणी राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळांच्या निर्दोष मुक्तता करण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे. मुंबई सत्र न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

#### दाऊद इब्राहिमचा पुतण्या सोहेल कासकर फरार

**मुंबई :** तीन वर्षांपूर्वी फ्रान्समध्ये अटक करण्यात आलेला डॉन दाऊद इब्राहिम कासकरचा पुतण्या सोहेल कासकर फरार झाल्याचे समोर आले आहे. सोहेल याला भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते, मात्र तो दुबईमार्गे पाकिस्तानमध्ये जाऊन पोहचला आहे. त्यामुळे मुंबई पोलिसांच्या मोहिमेला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

## शेकापला धक्का! माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर समर्थकांसह भाजपमध्ये



*खारघरमध्ये काम करीत असताना जरी आम्ही विरोधी पक्षात होतो तरी नेहमीच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कामाची स्तुती करीत होतो. आता तुमच्याबरोबर काम करण्याची संधी मिळेल याचा आनंद होतोय. यापुढे खांद्याला खांदा लावून काम करू.*

**-गुरुनाथ गायकर, माजी नगरसेवक**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतील शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक आणि तत्कालीन खारघर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच गुरुनाथ गायकर यांनी गुरुवारी (दि. १३) आपल्या असंख्य समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी गायकर व सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत केले.

पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, महापालिकेचे स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, प्रवीण पाटील, निलेश बावीस्कर, हरेश केणी, बबन मुकादम, खारघर सरचिटणीस कीर्ती नवघरे, सुरेश ठाकूर, दत्ता वर्तेकर, विजय पाटील, विश्वनाथ केणी, के. के. म्हात्रे, भाऊ भगत, मोतीलाल कोळी आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## देशात लॉकडाऊन लागणार नाही

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्पष्ट संकेत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोरोनाची सध्याची परिस्थिती लक्षात घेता देशात लॉकडाऊन लागणार नाही, पण अर्थव्यवस्थेची गाडी रुळावर आणायची असेल, तर स्थानिक पातळीवर कंटेन्मेंट झोन तयार करून या आजाराला आळा घालण्याची आवश्यकता असल्याचे मत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले. देशभरातील ३० राज्यांतील मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्यानंतर पंतप्रधान जनतेशी संवाद साधत होते.

कोरोनाच्या चाचण्या वाढवण्याची सूचना पंतप्रधानांनी राज्यांना दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, केंद्राने राज्यांना २३ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. त्याचा वापर करून अनेक राज्यांनी आपल्या आरोग्यविषयक सुविधांचा विकास केला. भविष्यातील आरोग्यविषयक संकटे लक्षात घेता आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा जास्तीत जास्त चांगल्या कराव्यात.



होम आयसोलेशनमध्ये जास्तीत जास्त उपचार होणे शक्य आहे. ट्रॅकिंग आणि ट्रिटमेंट योग्य पद्धतीने केल्यास रुग्णालयात जाण्याची आवश्यकता नाही, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

# महाराष्ट्रात कायदा-सुव्यवस्थेच्या चिंधड्या

## वर्ध्यातील गर्भपाताच्या गोरखधंद्यावरून भाजप नेत्या चित्रा वाघ यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील आर्वीच्या कदम हॉस्पिटल परिसरात अर्भकांच्या ११ कवट्या आणि ५२ हाडे आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. यावरून भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला आहे. कायदा-सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडाल्याचे आपल्याला महाराष्ट्रात पाहायला मिळत आहे, अशी घणाघाती टीका वाघ यांनी केली.

राज्यात अपहरणकर्ती टोळी तर फिरतेच आहे आणि आता तर अल्पवयीन-तरुण मुलींच्या अवैध गर्भपाताचा गोरखधंदाही उघड झालाय. चिमुकल्या जीवांशी खेळण्याची ३०-३० हजारात सौदेबाजी चालली आहे. कायदे कमजोर नाहीत. कायद्याच्या रक्षणकर्त्यांचा जोर ओसरलाय. राज्य सरकार असेल थंड तर आता आम्हीच पुकारू बंड, असा चित्रा वाघ यांनी इशारा दिला आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर बोलताना चित्रा वाघ म्हणाल्या की, अतिशय धक्कादायक आणि संतापजनक घटना वर्धामधील आर्वी येथे घडली. १३ वर्षीय मुलीवर अत्याचार करण्यात आला. त्याच्यात ती गर्भवती राहिली आणि आरोपीच तिला गर्भपातासाठी घेऊन गेला. ३० हजारांत व्यवहार झाला अशी बातमी ११ जानेवारी रोजी समजली. आर्वी पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी धाव घेतली आणि धक्का बसला की, काही कवट्या, हाडे, गर्भपिशव्या त्या ठिकाणी सापडल्या. याचा अर्थ मोठा गोरखधंदा तिथे सुरू होता. किती अवैध गर्भपात तिथे केले गेले? किती मुलांना मारले गेले? किती चिमुकल्यांची हत्या केली गेली? हे सांगता येणार नाही.



सांगलीच्या म्हैसाळची पुनरावृत्ती या ठिकाणी झाल्याचे वाटत आहे. मला आठवतेय की सांगलीच्या म्हैसाळमध्ये अशाच प्रकारची घटना घडली होती. या सगळ्या प्रकरणाचे मूळ जर पाहिले तर ते कुठे ना कुठे राज्याच्या कायदा सुव्यवस्थेकडे जातेय. कारण, या १३ वर्षाच्या मुलीवरती लैंगिक अत्याचार करण्यात आला होता. माझ्याकडे अशा प्रकारे अत्याचार झालेल्या आणि त्यांनी बाळाला जन्म दिलेल्या अनेक मुलींची यादी आहे.

याचबरोबर, मला असे वाटते की या पार्श्वभूमीवर नक्कीच गृहविभाग आणि आरोग्य विभागाने एकत्रित येऊन एखादी योजना बनवली पाहिजे. कायदे हे कधीच कमकुवत नसतात, परंतु त्याची अंमलबजावणी करणारे मात्र कमकुवत झाल्याचे पाहायला मिळत आहे. म्हणून या हरामखोरांना सोडता कामा नये, राज्यात २५ हजार महिला गायब झाल्याची धक्कादायक माहिती गृहमंत्र्यांनी दिलेली आहे आणि त्यातील कित्येक जणींसोबत असा प्रकार झाला असेल, याची भीती आता वाटते आहे. त्यामुळेच याची गंभीर दखल घेणे तितकेच गरजेचे आहे, असे चित्रा वाघ म्हणाल्या आहेत.

दरम्यान, पोलिसांनी एका खड्ड्यात सापडलेली ही अर्भकांची हाडे आणि कवट्या पुढील तपासणीसाठी नागपूरच्या प्रयोगशाळेत पाठवण्यात आली आहेत. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर सखोल चौकशी करण्याची भूमिका पोलिसांनी घेतली आहे. पोलिसांनी आरोपी डॉ. रेखा कदमला अटक केली आहे, तसेच डॉ. कदम यांच्या सासूलाही ताब्यात घेतले आहे.

## नागोठण्याजवळ भीषण अपघात

### दोन ठार, पाच जण जखमी

**नागोठणे : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणेजवळील कानसई गावानजीक उभ्या असलेल्या ईरटीका गाडीला गुरुवारी (दि. १३) सकाळी ट्रेलरने ठोकर दिली. या अपघातात दोन ठार तर पाच जण जखमी झाले.

शुभम घोगले (वय २२, रा. ठाणे) हे त्यांच्या सहकाऱ्यांसोबत गुरुवारी सकाळी ईरटीका गाडी (एमएच ०४ जे ९६९८) मधून मालवणकडे जात होते. मुंबई-गोवा महामार्गावरील कानसई गावच्या हद्दीत बिजली हॉटेलजवळ रस्त्याच्या बाजूला गाडी उभी करून अमित विनोद कवळे (वय २१), टेरेस करवलो (वय २२) व रोहन रवींद्र जाधव (वय २२) गाडीतून खाली उतरले. त्या



वेळी गोव्याकडे जाणाऱ्या ट्रेलर (एमएच ४६ एएफ ५६०५) ने त्या तिघांना जोरदार ठोकर देऊन ईरटीका गाडीला मागून धडक दिली. या अपघातात अमित कवळे जागीच ठार झाले तर टेरेस करवलो, रोहन जाधव, कमलेश आंबेकर, शुभम सुनील घोगळे, सोनल सुनील घोगळे, कैसर रहमान (सर्व रा. ठाणे) हे जखमी झाले. त्यांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी टेरेस करवलो याला मृत घोषित केले. या अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## भालिवडी आश्रमशाळेतील आणखी सात विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह

### एनडी स्टुडिओतही १७ जणांना कोरोनाची लागण

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील भालिवडी आश्रमशाळेतील आणखी सहा विद्यार्थिनी कोरोना पॉझिटिव्ह झाल्या आहेत, तर कशेळे ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यालादेखील कोरोनाची लागण झाली आहे. दरम्यान, खालापूर तालुक्यातील एनडी स्टुडिओमधील १७ जणांची कोरोना टेस्ट पॉझिटिव्ह आली आहे.

कर्जत तालुक्यात पाच ठिकाणी आदिवासी आश्रमशाळा असून त्या आश्रमशाळेत दहावी आणि बारावीचे विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत. त्यातील भालिवडी येथील मुलींच्या आश्रमशाळेतील एका विद्यार्थिनीला काही दिवसांपूर्वी कोरोना झाला होता, त्यानंतर गुरुवारी या आश्रमशाळेतील आणखी सहा मुली पॉझिटिव्ह झाल्या.

या निवासी आश्रमशाळेतील शिक्षक बाहेरून येत असल्याने विद्यार्थी कोरोनाग्रस्त होत आहे, त्यामुळे या शिक्षकांच्या प्रवासावर बंधने आणावीत, अशी मागणी आदिवासी विकास विभागाचे पेण प्रकल्प नियोजन समिती अध्यक्ष दत्तात्रय सुपे यांनी केली आहे.

## पनवेल महापालिकेच्या नवनिर्वाचित सभापतींनी स्वीकारला पदभार

### सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दिल्या शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती सभापतींची निवड मंगळवारी झाली. त्यानुसार प्रभाग समिती 'अ' सभापती संजना कदम, प्रभाग समिती 'ब' सभापती प्रमिला पाटील यांनी बुधवारी (दि. १२), तर प्रभाग समिती 'क' सभापती अरुणा भगत यांनी आपला पदभार गुरुवारी (दि. १३) स्वीकारला. त्यानिमित्त महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी प्रभागातील स्वच्छता, पथदिवे, पाणी समस्या, तसेच औषध फवारणी यांसारख्या नागरी समस्यांबाबत उपाययोजना करण्याच्या दृष्टिकोनातून बैठक झाली.

या बैठकीला पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, उपमहापौर सीता पाटील, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, नगरसेवक विजय चिपळेकर, अभिमन्यू पाटील, बबन मुकादम, समीर ठाकूर, अमर पाटील, प्रवीण पाटील, अनिल भगत, नितीन पाटील, विकास घरत, दिलीप पाटील, नगरसेविका मोनिका महानवर, नेत्रा पाटील, आरती नवघरे, कुसुम म्हात्रे, हेमलता म्हात्रे, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, किरण पाटील, समीर कदम, अमर उपाध्याय, भाऊ भगत, प्रकाश पाटील, आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, तसेच महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.
















पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे आराध्य दैवत दिवंगत दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या संग्राम निवासस्थानी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी जाऊन 'दिबां'च्या प्रतिमेला अभिवादन केले. या वेळी प्रभाग समिती 'ड' सभापती ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, हरेश केणी, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर आदी उपस्थित होते. त्यांनीही अभिवादन केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत फडके विद्यालयाचे यश

**पनवेल** : शिष्यवृत्ती परीक्षेत नवीन पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

विद्यालयातील इंग्रजी माध्यमाच्या एकूण सहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली असून त्यातील विशाल अर्जुन परब, वेदिका भावेश चंदने, ऐश्वर्या सूर्यकांत पाटील, कृणाल विठ्ठल कुंभार, वेदा पराग अळशी हे पाच विद्यार्थी पूर्व उच्च प्राथमिक परीक्षेत तर वेदांत रमेश गाडे हा विद्यार्थी पूर्व माध्यमिक परीक्षेत उत्तीर्ण झाला आहे.

## 'दिबां'च्या जयंतीनिमित्त रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त जासई ते पनवेल येथे त्यांच्या निवासस्थानी व त्यानंतर पनवेल ते कामोठे मशाल रॅली काढण्यात आली. गेली पाच वर्षे दि. बा. पाटील यांच्या विचारांची ज्योत घेऊन ही रॅली काढण्यात येते.

लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्व जण या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. या रॅलीमध्ये 'दि. बा. पाटील अमर रहे' अशा घोषणादेखील देण्यात आल्या, तसेच 'दिबां'च्या कार्याची जाणीव व्हावी आणि भविष्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव लागावे, अशी ठाम भूमिका या वेळी रॅलीतील सहभागी नागरिकांनी व्यक्त केली.



पान १ वरून

## 'दिबां'चे नाव लागल्याशिवाय विमान उडणार नाही!

ना. आठवले पुढे म्हणाले की, रामशेठ ठाकूर आणि मी मित्र आहोत. ते एक दिलदार व्यक्तिमत्त्व आहे. संघर्ष करून ते पुढे आले. 'दिबां'च्या नेतृत्वाखाली संघर्ष करणारा माणूस म्हणून आम्ही त्यांना ओळखतो. 'दिबां'नी सर्वांसाठी संघर्ष केला. भूमिपुत्रांना न्याय मिळावा म्हणून ते जेलमध्येही गेले होते. सिडकोने जमिनी घेतल्या, मात्र प्रकल्पग्रस्तांच्या जीवनाचा विचार सिडकोने केला नाही. गावांचे योग्य पुनर्वसन, बांधकाम परवानगी, रोजगार, नोकरी असे अनेक प्रश्न आहेत जे सिडको आणि राज्य सरकार सोडवू शकतात, पण ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिकोनातून जाणूनबुजून दुर्लक्ष होत आहे.

आपल्या भाषणात ना. आठवले यांनी त्यांच्या खास शैलीत सिडको, ठाकरे सरकारचा खरपूस समाचार घेतला. 'दिबां'वर कविता सादर करीत त्यांना आदरांजली वाहिली आणि भीमशक्ती 'दिबा'शक्तीमध्ये एकवटली असल्याचे अधोरेखित केले. न्याय मिळत नाही म्हणून मागण्यांसाठी हा एल्गार आहे, असेही त्यांनी नमूद केले.


अध्यक्षीय भाषणात कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूमिपुत्रांच्या दृष्टिकोनातून दोन ठराव जाहीर केले. काहीही झाले तरी 'दिबां'च्या १००व्या जयंतीपूर्वी त्यांचे नाव विमानतळाला लागलेच पाहिजे, तसेच सिडकोसंदर्भातील प्रकल्पग्रस्तांचे, बहुजनांचे प्रश्न सुटलेच पाहिजेत. नाही तर २४ जानेवारीला विमानतळाचे काम करून द्यायचे नाही, असे दोन ठराव त्यांनी जाहीर करताच सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रास्ताविकातून लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा गजर केला. 'दिबां'च्या नावाचे आंदोलन आपले मानून या लढ्यात सहभाग घेतल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. आंदोलन होऊ नये यासाठी सिडकोने अनेक प्रयत्न केले, पण 'दिबां'चे नाव प्रत्येक भूमिपुत्राच्या हृदयात असल्याने 'दिबां'चेच नाव विमानतळाला लागेपर्यंत हे आंदोलन सुरूच राहाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जीवाचे काहीही झाले तरी चालेल, पण 'दिबां'चे नाव लागलेच पाहिजे हे भूमिपुत्रांनी दाखवून दिले असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

आमदार महेश बालदी यांनी म्हटले की, हा पोलीस आणि भूमिपुत्रांचा संघर्ष नाही, तर सिडको आणि भूमिपुत्रांचा आहे. त्यामुळे पोलिसांनी हे लक्षात घ्यावे, असे सांगतानाच गरीब भूमिपुत्रांचा आवाज सिडको आणि ठाकरे सरकारला का ऐकू येत नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या वेळी माजी खासदार जगन्नाथ पाटील, कॉ. भूषण पाटील, दशरथ भगत, रूपेश धुमाळ, गुलाब वझे, संतोष केणे, जयेश आक्रे, प्रेम पाटील यांचीही भाषणे झाली. दरम्यान, कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांना कोरोनाचा संसर्ग झाला असल्याने ते या भूमिपुत्र निर्धार परिषदेला उपस्थित राहू शकले नाहीत.

## शेकापला धक्का! माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर समर्थकांसह भाजपमध्ये

या वेळी माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, माजी उपसरपंच संतोष गायकर, शेकाप महिला आघाडीच्या शहराध्यक्ष पूनम गुरुनाथ गायकर, पुरोगामी युवक संघटनेचे शहर अध्यक्ष सुदर्शन नाईक, जैन, गुजराती समाजाचे जिल्हाध्यक्ष विनोद पटेल, चंदगीराम बलवान, पटेल समाजाचे अध्यक्ष मुकेश पटेल, धरमवीर, प्रवीण शिंदे, राजेंद्र सोनी, जयेश गायकर, रामचंद्र रांजणे, विनोद मुसा, रोहिदास गायकर, पांडुरंग गायकर, अशोक वायदंडे, पंकज पटेल, राम खापेकर, यशवंत नागवेकर, बबन घाडगे, निलेश कदम, सुभाष वारगे, नंदू गोसावी, विकी गायकर, विश्वास पाटील, संजय तोडेकर, संजय मोहिते, महेंद्र पाटील, भालचंद्र सुर्वे, राजू शिर्के, इशांत गायकर, अतुल सावडावकर, रघुनाथ गायकर, सचिन पाटील, संकेत गायकर, मितेश गायकर, प्रितेश गायकर, भोलानाथ गायकर, प्रमोद कामोठकर, अजय निकम, तानाजी बाबर, ज्ञानेश्वर जगताप आदींनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि अन्य मान्यवरांनी स्वागत केले.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. १४ जानेवारी २०२२ रोजी होणारे
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

**कोविशिल्ड**

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
६. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
७. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
८. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
९. न्यु इंग्लिश स्कुल, कळंबोली
१०. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
११. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
१२. काळण समाज हॉल, पनवेल
१३. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१४. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

*कोवॅक्सिन लसीच्या तुटवड्यामुळे कोणत्याही लसीकरण केंद्रावर कोवॅक्सिनचे लसीकरण होणार नाही.*

*प्रिकॉशन डोस हे फक्त दुसरा घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या आरोग्यसेवा कर्मचारी, फ्रंटलाईन वर्कर्स आणि ६० वर्षांवरील कोमॉर्बिड व्यक्तींचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.*

# बहुतांश कोरोना रुग्णांवर घरीच उपचार

## नवी मुंबई महापालिका अधिकाऱ्यांची माहिती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरात कोरोनाचे सध्या दैनंदिन रुग्ण दोन हजारांच्या घरात आढळत असून उपचाराधिन रुग्ण १७ हजारांच्या घरात गेले आहेत. यापैकी ६० टक्के म्हणजे १० हजार रुग्णांवर घरीच उपचार सुरू आहेत. घरीच उपचार घेणाऱ्या रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले नसल्याची माहिती महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

शहरात दिवसाला सरासरी दोन हजार कोरोना रुग्ण आढळून येत आहेत. बुधवारी नवे रुग्ण २२४१ सापडले. महिन्याभरापूर्वी याचे प्रमाण हे सुमारे ३० ते ४० इतकेच होते. सध्या नवी मुंबईत १७५४४ कोरोनाबाधित रुग्ण आहेत. त्यापैकी १०२४९ कोरोना रुग्णांवर घरीच उपचार सुरू आहेत. तर ७२९५ रुग्णांवर रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. उपचाराधीन रुग्णांची संख्याही वाढली आहे, परंतु करोनाबाबतच्या नियमावलीमध्ये बदल झाल्याने पालिकेला काहीसा दिलासा मिळाला आहे. त्याचबरोबरच पालिकेने 'टास्क फोर्स'सोबत घेतलेल्या बैठकीत नव्या उत्परिवर्तित विषाणूमुळे झपाट्याने रुग्ण दगावण्याची शक्यता कमी असल्याचे मत अनेक डॉक्टरांनी व्यक्त केले आहे.

कोरोनामुक्तीचा कालावधीही १० दिवसांवरून कमी करून ७ दिवस आणल्याने उपचाराधीन रुग्णांची संख्या नव्या रुग्णांच्या मानाने नियंत्रणात असल्याचे मत पालिका प्रशासनाने व्यक्त केले आहे. कोरोनाच्या या लाटेत कमी-जास्त प्रमाणात विविध वयोगटांतील नागरिक करोनाबाधित होत आहेत. त्यामुळे पालिकेने आगामी काळात उपचाराधीन रुग्णही झपाट्याने कमी होणार असल्याचे चित्र आहे. गेले काही दिवस कारोना रुग्णांत मोठी वाढ होत होती, मात्र सुदैवाने रुग्ण दगावल्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

लसीकरणालाही वेग आला असून १५ ते १८ वयोगटाचे लसीकरण सुरू आहे. यात अपंग विद्यार्थ्यांसाठी नेरूळ व ऐरोली पालिका रुग्णालयात विशेष लसीकरण सत्र घेण्यात येत आहे.

**शहरात नवे रुग्ण कमी-जास्त होत असून ही संख्या सरासरी दोन हजारांपर्यंत येत असून शहरात ६० टक्क्यांच्या वर करोनाबाधित गृहविलगीकरणात आहेत. त्यामुळे उर्वरित उपचाराधीन रुग्णांची संख्या कमी-जास्त प्रमाणात येत आहे. १६ हजार रुग्ण उपचाराधीन आहेत. पुढील काही दिवसांत उपचाराधीन रुग्णसंख्याही कमी येण्याची शक्यता आहे.**

**-अभिजित बांगर,**
**आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

## निवडक

### वारदोलीतून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील वारदोली गावात राहणारी यज्ञा दिसले ही २१ वर्षीय तरुणी राहत्या घरातून कोणाला काही न सांगता निघून गेली. त्यामुळे ती हरविल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. यज्ञा दिसले हिची उंची पाच फूट दोन इंच, वर्ण गोरा, केस काळे लांब, बांधा मध्यम, गोल चेहरा असून अंगात पिवळी कुर्ती व गुलाबी स्वेटर, तसेच पायजमा, पायात पैंजण, स्लिपर चप्पल सोबत मोबाइल फोन आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे पोहवा संजय साळुंके यांच्याशी संपर्क साधावा.

### टँकर उलटल्याने अमोनियाची गळती

**पनवेल :** पनवेलजवळील टी पॉईंट येथे झालेल्या अपघातात एक टँकर उलटल्याने त्यातून अमोनियाची गळती सुरू झाली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहचल्याने त्यांनी ही गळती अटोक्यात आणली आहे. जेएनपीटी मार्गावरील कळंबोली टी पॉईंट येथे कंटेनर व अमोनिया टँकरची समोरासमोर धडक झाली. या धडकेत अमोनिया असलेला टँकर उलटला व त्यात असलेला वायू बाहेर निघू लागला. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब, वाहतूक शाखेचे अधिकारी घटनास्थळी पोहचून त्यांनी ही वायुगळती रोखली. दरम्यान, या टँकरमध्ये अडकलेल्या चालकालासुद्धा बाहेर काढण्यात आले आहे. या घटनेत काही काळासाठी वाहतूक कोंडी झाली होती.

### आसूडगाव येथून दोघे बेपत्ता

**पनवेल :** आसूडगाव येथे राहणारे ६५ वर्षीय मांगो कुंडलिक महाजन व ४२ वर्षीय रवींद्र मारुती मर्यापगोळ हे हरवले असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आलीय. महाजन हे अंगाने सडपातळ, उंची पाच फूट, रंग गोरा, चेहरा उभट असून अंगात पांढरा शर्ट, पॅन्ट, चप्पल आहे. डाव्या खांद्यावर तीळ असून डाव्या पायाने वाकडे चालतात. त्यांना मराठी, खानदेशी भाषा बोलता येते, तर मर्यापगोळ हे अंगाने मध्यम, उंची पाच फूट, रंग सावळा, चेहरा गोल, अंगात शर्ट, पॅन्ट व पायात सँडल आहे. त्यांच्या उजव्या हाताच्या तळहातावर तीळ असून त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड भाषा बोलता येते. या व्यक्तींबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक ए. बी. पवार यांच्याशी संपर्क साधावा.

### महिलेला चार लाखांचा गंडा

**पनवेल :** अज्ञात सायबर चोरट्याने खारघर सेक्टर-५ मधील महालक्ष्मी मंदिरातील एका ७३ वर्षीय वृद्ध संन्यासी महिलेला लाखोंचा गंडा घातला आहे. डेबिट कार्ड सुरू करून देण्याच्या बहाण्याने तिच्या बँक खात्यातील पेन्शनची तब्बल चार लाख रुपयांची रक्कम परस्पर लांबविल्याची घटना उघडकीस आली आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी अ‍ॅक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

# सुकापूरमध्ये बसथांब्याचे लोकार्पण

## दिवेश बुवाशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापूर ग्रामपंचायतीचे सदस्य दिवेश बुवाशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त बसथांब्याचे लोकार्पण भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी मान्यवरांनी दिवेश भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छाही दिल्या, तसेच स्व. मधुशेठ विठ्ठल भगत यांच्या स्मरणार्थ अन्न-छत्र अंतर्गत अन्नदान करण्यात आले.





या वेळी जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती हर्षदा अमर उपाध्याय, नगरसेवक समीर ठाकूर, डॉ. अरुणकुमार भगत, सुकापूरच्या सरपंच योगिता राजेश पाटील, उपसरपंच अशोक पाटील, संजय पाटील, माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, आलुराम केणी, मेनका खुटले, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, अ‍ॅड. चेतन केणी, पूनम प्रमोद भगत, पुष्पा म्हस्कर, कविता पोपेटा, प्राची जाधव, ज्योती केणी, रवींद्र केणी, उदय म्हस्कर, पंकज पोपेटा, प्रमोद भगत, राजेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, दीपक भगत, सागर भोपी, विवेक पाटील, पुंडलिक भगत, दिलीप भगत, सुरेश भगत, महेंद्र भगत, जयराम भगत, नंदू भगत, हनुमंत खुटले, राजेंद्र पाटील, यतीन पाटील, महेश पाटील, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात एक्सेल प्रशिक्षण कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील आयटी विभाग व डीएलएलएलई यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. १३) अ‍ॅडव्हान्स एक्सेल प्रशिक्षणाचे आयोजन केले.



यात बी. के. एक्सेल नेटवर्कचे प्रशिक्षण सर बीरू कोलेकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या वेळी प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी प्रस्तावनेत एक्सेल प्रशिक्षणाचे आजच्या काळात असलेले महत्त्व पटवून दिले. या वेळेस आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे व इतर प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

आयटी विभागाचे प्राध्यापक व डीएलएलईचे अध्यक्ष प्रा. महेश धायगुडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. राजश्री म्हात्रे यांनी अतिथींचे स्वागत केल, तर प्रा. मीनल मांडवे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या आयोजनाठी प्रा. रश्मी पाटील यांनी सहकार्य केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त असल्याचे नमूद करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांची प्रशंसा केली.



# कामोठे येथे स्वच्छता मोहीम

**कामोठे :** लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महापालिकेतर्फे सेक्टर २० सिडको गार्डन येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यात नागरिकांनी सहभाग घेत गार्डन स्वच्छ केले.

या वेळी नगरसेवक विजय चिपळेकर, आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, रवींद्र म्हात्रे, स्वच्छता निरीक्षक ऋषिकेश गायकवाड, अतुल वास्कर, विठोबा गायकर, भाऊ म्हात्रे, परशुराम म्हात्रे, सुनील चिपळेकर, महेश चिपळेकर, चंद्रकांत चिमणे व महापालिका कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त पनवेल पालिकेतर्फे परिसंवाद

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे. या अंतर्गत स्वामी विवेकानंद जयंती तसेच राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. १२) भारत : कल-आज-कल या विषयावर ऑनलाइन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.




या परिसंवादात सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे यांनी विविध विचारांची मांडणी केली. दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय, रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर, दादासाहेब लिमये महाविद्यालय कळंबोली, सीकेटी महाविद्यालय नवीन पनवेल, सरस्वती महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयातील जवळपास १०० विद्यार्थ्यांनी या परिसंवादात सहभाग घेतला.

या वेळी डॉ. बबन जाधव, महेश धायगुडे या प्राध्यापकांनीदेखील या परिसंवादात सहभागी होऊन आपली मते मांडली. पनवेल, कर्जत, महाड, ऐरोली येथील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी परिसंवादात सहभागी होऊन भ्रष्टाचार, महिलांचे प्रश्न, सोशल मिडीया, व्यसनाधिनता याबद्दल आपले विचार मांडले. तसेच राजमाता जिजाऊंनी केलेल्या कर्तृत्वाची माहिती सांगून, आजच्या स्त्रीयांच्या परिस्थितींचा आढावा घेतला.

**पनवेल : लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त गव्हाण ग्रामपंचायतीमध्ये अभिवादन करण्यात आले. या वेळी सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, सचिन घरत, अरुण कोळी, रोशन म्हात्रे, पंकज पाटील, हेमंत पाटील, एम. डी. पाटील व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.**



# उरणमध्ये विविध पक्ष्यांची किलबिल

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील निसर्गसंपन्न चिरनेर, कळंबुसरे जंगल गुलाबी थंडीच्या वातावरणात विविधरंगी पक्ष्यांनी फुलून गेले आहे. त्यांच्या मंजुळ किलबिलाटाने निसर्गप्रेमीं सुखावून गेले आहेत.



उरण तालुक्याच्या पूर्व भागात निसर्गसौंदर्याने नटलेल्या डोंगरकुशीत चिरनेर, कळंबुसरे गावे वसलेली आहेत. पूर्व भागात विस्तीर्ण जंगल पसरले आहे. या जंगलात मोठ्या प्रमाणात जंगली पशूपक्ष्यांचे वास्तव्य आहे. या जंगलात मुबलक नैसर्गिक पाणवठे असल्याने हे जंगल पशूपक्ष्यांचे आश्रयस्थान झाले आहे.

सध्या गुलाबी थंडीचे मस्त वातावरण असल्याने जंगल भ्रमंती करताना या जंगलात विविधरंगी अनेक प्रजातींच्या पक्ष्यांचे मनोहारी दर्शन होते. मोर, लांडोर, रानकोंबडे, सुतार पक्षी, कोकीळ, बुलबुल, यलो स्पॅरो, गवळण, सोनकावळे, तितर, धनेश गरूड, पोपट, दयाळ, घार, घुबड यासारखे विविध जातींचे पक्षी सहज नजरेस पडतात. त्यांचा मंजूळ किलबिलाट मनाला सुखावून जातो.

या जंगलात आदिवासी समाजाची मोठी वस्ती असूनही या समाजातील तरुणांनी जंगलातील पशू-पक्षांची शिकार न करण्याचा निर्धार केल्याने चिरनेर, कळंबुसरे जंगलात सध्या विविध पशूपक्ष्यांबरोबरच मोर-लांडोरींची संख्या झपाट्याने वाढेल.

पूर्व भागातील जंगल पक्षीप्रेमींना पक्षी निरीक्षणासाठी पर्वणी ठरणार आहे. या जंगलातील पशूपक्ष्यांना अभय दिले, तर निसर्गप्रेमी जनतेला हा निसर्गठेवा नेहमीच अनुभवायला मिळणार आहे. शहराच्या गर्दीतून निघून चिरनेर, कळंबुसरे परिसरातील जंगलात पायपीट केली, तर निसर्गप्रेमींना नक्कीच सुखद अनुभव मिळणार आहे.

**आपण जंगलांचे संवर्धन केले, तर पशूपक्ष्यांसाठी ती जंगले-आश्रयस्थाने ठरतात. पर्यायाने निसर्गाच्या सान्निध्यातील विविध पशूपक्ष्यांना जवळून पाहण्याची संधी आपणाला मिळते. हे समाधान नक्कीच श्रेष्ठ आहे. त्यामुळे प्रत्येकाने निसर्गाचा ठेवा जपायला हवा.**

**-महेश भोईर,**
**निसर्गमित्र व पक्षीमित्र, कळंबुसरे**

# पनवेलमध्ये २७,३४१ नवीन मतदारांची नोंदणी

**खारघर : प्रतिनिधी**

मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनःनिरीक्षण कार्यक्रम नुकताच झाला. याकरिता ठिकठिकाणी शिबिरे भरविण्यात आली होती. पनवेलमध्येदेखील हा कार्यक्रम तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यामध्ये २७३४१ नवीन मतदारांची नोंदणी तहसील कार्यालयामार्फत झाली.

छायाचित्र नसलेली, मयत मतदारांची सुमारे ५१ हजार नावे या मतदार याद्यांतून वगळण्यात आली. ऑनलाइन मतदार यादी ceo.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर शोधावी. तुमचा नाव मतदार यादीत आहे की नाही याची पडताळणी करा. मतदार यादीमध्ये नाव नसेल, तर मतदानाच्या वेळी अडचण निर्माण होऊ शकते. मतदार नोंदणीचा कार्यक्रम सुरूच राहणार असल्याने नवीन मतदार आपली नोंदणी करू शकतात.

छायाचित्र नसल्याने ज्या मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आले आहे. ते मतदार ६ क्रमांकाचा फॉर्म भरून पुन्हा आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करू शकतात, असे तहसीलदार विजय तळेकर यांनी सांगितले.

समाजात असेही काही घटक आहेत. ते अशाप्रकारे सरकारी कार्यक्रमातून नाईलाजाने दूर राहत असतात. काहींना शारीरिक व्याधीमुळे अडचणी निर्माण होत असतात, तर काही घटकांना समाजाच्या भीतीमुळे अथवा काही कारणास्तव पुढे येत नाही. याकरिता तहसीलदार विजय तळेकर यांनी अशा घटकापर्यंत पोहचून मतदार नोंदणी शिबिरे आयोजित केली. यामध्ये १० तृतीयपंथी, ६४ देहविक्री करणाऱ्या महिलांचे नाव मतदार यादीत नव्याने समाविष्ट करून घेतली. अपंग बांधवांसाठीदेखील सोयीस्कररीत्या शिबिरे घेऊन त्यांचीही मोठ्या प्रमाणात नावे नव्याने मतदार यादीत समाविष्ट केली.

# कोविडबाबत शंकाचे निरसन; पनवेल तहसीलमध्ये कॉल सेंटर

**खारघर :** कोरोनाचा प्रादूर्भाव वाढत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सर्व तहसील कार्यालयांमध्ये कोविड-१९ कॉल सेंटर सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पनवेल तहसीलदार कार्यालय येथे कोविड-१९ कॉल सेंटर सुरू करण्यात आले आहे.

कोविड संदर्भात अडीअडचणी, तसेच चौकशी संदर्भात ०२२-२७४५२३९९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे. रविवारीदेखील सुटीच्या दिवशी हे कॉल सेंटर सुरू असल्याने कोविडबाबत शंकांचे निरसन होत आहे. कॉल सेंटरमधील एस. खामकर या कर्मचाऱ्यांमार्फत नागरिकांच्या शंकाचे निरसन होत आहे.

# गव्हाण विद्यालयात रयत बँक दिनदर्शिकेचे वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत कोऑपरेटिव्ह बँक मर्या. सातारा ही रयत परिवाराची विश्वासार्ह अर्थवाहिनी असणाऱ्या व रयत परिवारातील शैक्षणिक क्षेत्रातील सेवकांच्या अर्थकारणासाठी सतत कार्यशील असणारी बँक आहे. रयत शिक्षण संस्थेतील सेवकांच्या आर्थिक उन्नयनासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील या थोर शिक्षणमहर्षीने स्थापन केलेल्या बँकेच्या सन २०२२ या वर्षीच्या वार्षिक दिनदर्शिकेचे वितरण येथील रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील सर्व सेवकांना करण्यात आले.

बँकेचे संचालक व वाशी शाखेचे चेअरमन आणि संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या हस्ते रयत बँकेच्या या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन व वितरण करण्यात आले. या वेळी विद्यालयाचे उपप्राचार्य जगन्नाथ जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे यांच्यासह विद्यालयातील सेवक उपस्थित होते.



## संपादकीय

# पुन्हा आयाराम, गयाराम

निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या की पक्षफुटी आणि आयाराम–गयारामांच्या बातम्यांनी वृत्तपत्रांचे रकाने भरू लागतात. टीव्ही वृत्तवाहिन्यांवरच्या ब्रेकिंग न्यूजच्या केंद्रस्थानी या आयाराम–गयारामांचीच धावपळ असते. कुणाचे पारडे जड आणि कुणाचे खाली याचे आडाखे बांधून मगच दलबदलूंची ही पायदळे पळ काढत असतात. हा रोग सर्वपक्षीय आहे आणि एकदा लोकशाहीची चौकट मान्य केली की अशा प्रकारच्या घडामोडी स्वीकाराव्या लागतातच.

**उत्तर प्रदेशसारख्या विशाल राज्यामध्ये विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. तेथे अशा प्रकारच्या घटना घडतील हे सर्वांनीच गृहित धरले होते. उत्तर प्रदेश बरोबरच उत्तराखंड, पंजाब, मणिपूर आणि गोवा अशा एकूण पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकण्यात आले आहे आणि त्यापाठोपाठ आयाराम–गयारामांचे आनंद पर्यटन सुरू झाल्याचेही दिसत आहे. त्याला सध्या तरी काही इलाज नाही. कारण निवडणुकीआधी कोणी कुठल्या पक्षात जावे यावर कायद्याचे बंधन नसते. निवडणूक झाल्यावर मात्र विजयी उमेदवाराला पक्षांतरबंदीचा कायदा लागू होतो. उत्तर प्रदेशचे कामगार मंत्री स्वामीप्रसाद मौर्य आणि अन्य तीन आमदारांनी मंगळवारी भारतीय जनता पक्षाला रामराम ठोकला. त्यानंतर लगेचच तेथील पर्यावरणमंत्री दारासिंह चौहान आणि आणखी एक आमदार अवतारसिंह भदाना यांनी पक्ष सोडल्याची घोषणा केली. दोन मंत्री आणि चार आमदारांनी भाजपची कास सोडल्यामुळे विरोधी पक्षांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या आहेत. सत्तेवर भक्कमपणाने मांड ठोकून असलेल्या भाजपला कुणी अडचणीत आणले की या विरोधी पक्षांच्या आनंदाला पारावार राहात नाही. वास्तविक भाजपमधील घडामोडींवर लक्ष ठेवण्यापेक्षा आपल्या पायाखाली काय जळते आहे हे त्यांनी पाहण्याची गरज आहे. भाजपमधून मंत्री–आमदार पळाल्याच्या बातम्या ब्रेकिंग न्यूजमध्ये झळकत असतानाच काँग्रेस आमदार नरेश सैनी आणि समाजवादी पक्षाचे आमदार हरिओम यादव यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे वृत्त झळकले. आमदारांची ही पळापळ पाहून मतदारांचे मात्र झकास मनोरंजन होत आहे. दोन मंत्री आणि चार आमदार अन्य पक्षात निघून गेल्याचा धक्का सत्ताधारी भाजपला काही प्रमाणात तरी निश्चितच बसेल यात शंका नाही, परंतु हे प्रकार घडणार याची पूर्ण कल्पना भाजपच्या पक्षश्रेष्ठींना पूर्वीपासूनच असल्यामुळे निवडणुकीवर त्याचा कसलाही परिणाम होणार नाही असे सकृतदर्शनी तरी दिसते. गेल्या काही दिवसांमध्ये काही वृत्तवाहिन्यांनी उत्तर प्रदेशातील निवडणुकीसंदर्भात पाहणी करून अंदाज व्यक्त केले आहेत. या अंदाजांनुसार यंदाच्या निवडणुकीतही योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे सरकार निश्चितपणाने सत्ता राखणार असे सांगितले जाते. याची प्रमुख कारणे गेल्या पाच वर्षांत उत्तर प्रदेशात झालेला विकास आणि राममंदिर तसेच काशीविश्वनाथ परिसराचा कायापालट अशा भावनिक मुद्द्यांवरही योगी सरकारने घेतलेली आघाडी ही आहेत. तसे पाहू गेल्यास योगी आदित्यनाथ यांच्याशी स्पर्धा करू शकणारे नेतृत्वच उत्तर प्रदेशात उरलेले नाही. नाही म्हणायला, शिवसेना आणि राष्ट्रवादीसारखे काही छोटे पक्ष परिवर्तनाची भाषा करताना दिसतात. शिवसेना तर उत्तर प्रदेशात ५० ते १०० जागा लढवणार आहे. गोव्यात देखील ते भाजपला दणका देण्याची भाषा करत आहेत, परंतु या दोन्ही राज्यांमध्ये शिवसेनेला जेमतेम काही शेकडा मते मिळतात. मतदार त्यांना स्वीकारत नाहीत हे वारंवार दिसले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या या दर्पोक्तीला भाजपचे मतदार मतदानयंत्राद्वारे चोख उत्तर देतील.**

# रायगड जिल्ह्यात गुन्हेगारी वाढतेय!




**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी नुकतीच पत्रकार परिषद घेऊन जिल्ह्यातील गुन्हेगारी संबधातील महिती दिली. त्यात त्यांनी दिलेल्या माहितीनुसार जिल्ह्यात गुन्हे प्रकटीकरणाचे प्रमाण वाढले आहे. रायगड पोलिसांची ही कामगीरी नक्कीच चागंली आहे, परंतु दुसरीकडे आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण मात्र कमी आहे. गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ८२ टक्के असले, तरी आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण मात्र २४ टक्के आहे. हे व्यस्त प्रमाण आहे. त्यात सुधारणा करावी लागेल. गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. आमली पदार्थांचे गुन्हे वाढत आहेत. याला आळा घालणे हे रायगड पोलिसांपुढील आव्हान आहे.

रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात २०२१मध्ये २२५४ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी २०३१ गुन्हे उघडकीस आणण्यात रायगड पोलिसांना यश आले. २०२० पेक्षा २०२१ मध्ये २७३ गुन्हे जास्त घडले आहेत, परंतु मागील वर्षाच्या तुलनेत गुन्हे उघडकीस आण्याचे प्रमाण मात्र जास्त आहे. २०२०मध्ये गुन्हे अघडकीस आणण्याचे प्रमाण ७९ टक्के होते. यंदा हे प्रमाण ८२ टक्के आहे. रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात २०२१ मध्ये २२५४ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी २०३१ गुन्हे उघडकीस आणण्यात रायगड पोलिसांना यश आले. गुन्हे उघकीस आणण्याचे प्रमाण ८२ टक्के आहे. १० टक्के गुन्हे प्रलंबित आहेत. २०२० मध्ये गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ७९ टक्के आहे.

२०२१ मध्ये ३८ खुनाचे गुन्हे नोंदविले गेले, त्यापैकी ३७ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले. खोपोली येथील खून प्रकरणाचा तपास अद्याप लागलेला नाही. कारण ज्या व्यक्तीचा खून झाला आहे, त्याची ओळख पटलेली नाही. खुनाचा प्रयत्न करण्याचे २० गुन्हे घडले, ते सगळे उघडकीस आले. एक दरोडा टाकण्यात आला होता, तो उघडकीस आला. २३ जबरी चोरीचे गुन्हे दाखल झाले होते, त्यापैकी १३ उघकीस आले. १६१ घरफोड्या झाल्या, त्यातील ७८ घरफोड्या उघडकीस आल्या. ४०८ चोरीच्या प्रकरणांपैकी २२४ उघडकीस आणण्यात यश आले आहे. गुन्हे उघडकीस आणण्यात रायगड पोलीस दल कोकण परिक्षेत्रात सर्वोत्तम आहे.

पाच हजार २४९ जाणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. दोन जणांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हगारी अधिनियमान्वये (मोक्का) कारवाई करण्यात आली. एकाला स्थानबद्ध करण्यात आले. एका गुन्हेगारास हद्दपार करण्यात आले. तीन गुन्हेगार जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आला. जुगाराच्या १५३ ठिकणी कारवाई करून एक कोटी ३७ लाख ३८ हजार ८४६ रुपये जप्त करण्यात आले. ४३७ दारूबंदीच्या कारवाया करून ५२ लाख २६ हजार ४६९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १० अवैध शस्त्रे जप्त करण्यात आली. दरोडा, जबरी चोरी, घरफोडी व इतर चोरी यांचे ५९२ गुन्हे दाखल झाले होते, त्यापैकी ३१७ गुन्हे उघडकीस आणून चोरीस गेलेल्या मालापैकी तीन कोटी ३१ लाख ८८ हजार २३७ रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला.



महिला अत्याचाराचे १४७ गुन्हे दाखल झाले होते, त्यापैकी १४१ गुन्हे उघडकीस आणून आरोपींना अटक करण्यात आली. मोटार वाहनांवर कारवाई करून चार कोटी ३० लाख ३० हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला. २७२ बेवारस मोटार वाहनांचा लिलाव करून ३४ लाख १० हजार रुपये शासनाकडे जमा करण्यात आले. चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ५५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून मूळ मालकांना परत करण्यात आला. या सर्व जमेच्या बाजू आहेत.

दुसरीकडे आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण कमी आहे, ते नाकारून चालणार नाही. २०२१ मध्ये जिल्हा सत्र न्यायालयात १०८ खटल्यांचे निकाल लागले. त्यापैकी २६ आरोपींना शिक्षा झाली. याचा अर्थ आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण २४ टक्के आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालायत १५७८ खटल्यांचे निकाल लागले. त्यापैकी १२०३ आरोपींना शिक्षा झाली. हे प्रमाण ७६ टक्के आहे. गुन्हा झाल्यानंतर आरोपींना पोलीस अटक करतात, परंतु न्यायालयात गुन्हा सिद्ध होईपर्यंत त्या गुन्हेगाराला शिक्षा होत नाही. गुन्हे सिद्ध करावे लागतात. त्यात पोलीस दल कमी पडतेय, असे दिसतेय. जर आरोपींना शिक्षाच झाली नाही तर ते मोकाट सुटतात. त्यामुळे गुन्हे उघडकीस आणण्याबरोबरच त्याला शिक्षादेखील होणे तितकेच महत्त्वाचे असते. आरोपीला शिक्षा होण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

रायगड जिल्ह्यात संघटीत गुन्हेगारी नाही, ही चांगली बाब आहे, परंतु इतर गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. महिला अत्याचारांचे प्रमाण वाढले आहे. त्याचबरोबर अमलीपदार्थ संबंधातील गुन्हे वाढू लागलेत. त्याचे लोण ग्रामीण भागात पसरत आहे. नुकताच नवी मुंबई पोलिसांनी अलिबाग तालुक्यातील पेझारीजवळ एका घरावर छापा टाकून एमडी हा अमली पदार्थ तयार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण भागातदेखील अमली पदार्थाचे लोण पसरत आहे. अमली पदार्थ विक्री करणाऱ्या टोळ्यांना आवरणे हे रायगड पोलिसांसमोरील मोठे आव्हान आहे. अमली पदार्थांच्या विळख्यातून रायगडला बाहेर काढण्यास रायगड पोलिसांनी प्राधान्य द्यायला हवे.



# 'अवकाळी'मुळे रोहा तालुक्यात वालाचे उत्पादन घटण्याची शक्यता

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यात मोठ्या प्रमाणात घेण्यात येत असलेल्या वालाच्या पिकाचे अवकाळी पडलेल्या पावसामुळे नुकसान झाले आहे. त्यामुळे रोहा तालुक्यात या वर्षी वालाचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. येत्या १० ते १५ दिवसांत वाल येण्याची शक्यता आहे. त्यामुळे खवय्ये वालाच्या प्रतीक्षेत आहेत.


(छाया : महादेव सरसंबे)

भातशेतीनंतर रोहा तालुक्यात कडधान्याची लागवड केली जाते. वाल, तूर, मूग, हरभरा, चवळी आदी कडधान्यांची लागवड केली जाते. या पिकांमध्ये सर्वात कमी खर्चिक वालाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. दरवर्षी पोपटीसाठी वालाला मोठी मागणी असते.

रोहा तालुक्यात या वर्षी सुमारे एक हजार हेक्टर क्षेत्रावर वालाची लागवड करण्यात आली आहे. वाल पीक बहरत असताना दोन वेळा अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने वालाचे नुकसान झाले आहे. वरकस भागातील वाल चांगले आले असून खोलगट भागातील वालाचे मोठे नुकसान झाले आहे. खोलगट भागात पाणी साचल्याने वाल कुजले आहेत. येत्या १५ ते २० दिवसांत वालाचे पीक तयार होणार आहे.

सध्या पुणे व अन्य ठिकाणाहून रोह्याच्या बाजारात वालाच्या शेंगा येत आहेत, परंतु तालुक्यातील वाल अधिक रुचकर असल्याने पोपटी खवय्ये स्थानिक वालाच्या प्रतीक्षेत आहेत, मात्र वालाचे उत्पादन घटण्याची शक्यता असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी दिली.

# अखेर कर्जतमधील 'तो' ट्रान्सफार्मर हटविला

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील गुंडगे येथील वाहतुकीला अडथळा ठरणारा धोकादायक ट्रान्सफार्मर अखेर महावितरणने हटविल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

मागील काळात एमएमआरडीएच्या माध्यमातून गुंडगे प्रभागातील रस्त्याचे क्रॉकीटीकरण व रुंदीकरण करण्यात आले होते. पूर्वी रस्त्याच्या कडेला असलेला ट्रान्स्फार्मर रुंदीकरणामुळे रस्त्याच्या मध्यभागी आला. सिमेंट क्रॉक्रिटचा रस्ता बनविताना ट्रान्स्फार्मर अन्यत्र स्थलांतरित करणे अपेक्षित होते. मात्र तसे न करता घाईघाईत रस्ता बनविण्यात आला. परिणामी हा ट्रान्सफार्मर वाहतुकीला अडथळा ठरू लागला, तसेच ट्रान्स्फार्मरजवळच गजानन पार्क हे रहिवासी संकुल असल्याने येथील लहान मुले खेळतांना, नागरिक येथून ये–जा करतांनाध ोकादायक वाटत असते. त्यामुळे ट्रान्स्फार्मर येथून अन्यत्र स्थलांतरित करावा, अशी मागणी नागरिकांतून होत होती. महावितरणपुढे ट्रान्स्फार्मर अन्यत्र स्थलांतरित करण्यासाठी जागेचा प्रश्न होता. नगरसेवक गायकवाड यांनी हा प्रश्न सोडविल्याने अखेर धोकादायक ठरणारा ट्रान्स्फार्मर अन्यत्र स्थलांतरित करण्यात आला आहे. या वेळी महावितरणचे शहर शाखा अभियंता योगेश साबळे, सिनियर टेक्निशियन रवींद्र कदम, विद्युत सहाय्यक रोशनी रोकडे, अंजली चिंचोलकर यांनी ट्रान्सफॉर्मर बदलण्यासाठी सहकार्य केले.

# चौक, मुरूड, रोह्यात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांना अभिवादन



**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्याप्रसारिणी सभा या संस्थेच्या चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बुधवारी (दि. १२) राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभाताई देशमुख यांनी प्रतिमांचे पूजन करून राजमाता जिजाऊंच्या कार्याचे महत्त्व सांगितले. संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा यांनीही मनोगत व्यक्त केले, तसेच रेखा आंबवणे व हर्षदा जाधव यांनी विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्वला देशमुख शाळेचे मुख्याध्यापक बादशा भोमले, उपमुख्याध्यापिका कांता पुजारी, पर्यवेक्षक दिलीप मोळीक, प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या वेळी उपस्थित होते. साधना माळी यांनी आभार मानले.

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील धाटाव येथील एम. बी. मोरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे बुधवारी (दि. १२) राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. या वेळी प्रतिमा पूजन करण्यात आले. प्रा. नरेश घाग यांनी जिजाऊ आणि विवेकानंद यांच्या कार्याची महती सांगितली. राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. मयूर पाखर यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य प्रसन्ना म्हसळकर, प्रा. दर्शना शिंदे, प्रा. प्रणाली महाडिक, प्रा. योगिता नेहेते, प्रा. निकिता महाडिक, प्रा. कविता कांबळे आदी उपस्थित होते.

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील नगर परिषद कार्यालयात बुधवारी (दि. १२) राजमाता जिजाऊ आणि युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. नगर परिषदेचे माजी पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, वरिष्ठ लिपीक नरेंद्र नांदगावकर, आरोग्य अधिकारी राकेश पाटील, दीपक शिंदे यांच्यासह कर्मचारी या वेळी उपस्थित होते.


(छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

# शरीरातील संकेत ओळखा आणि व्यायाम सुरू करा

बदललेली जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या पद्धतीमुळे आपल्याला अनेक आजारांनी वेढलं आहे. त्यात गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या संकटामुळे ऑनलाईन काम म्हणजे घरी तासन्‌तास एका जागेवर बसून काम करतोय. त्यामुळे आपल्याला अनेक आजारांचा सामना करावा लागतोय. तुम्हाला माहिती आहे का तुमचे शरीर तुम्हाला येणाऱ्या आजाराचे संकेत देत असते. त्यामुळे हे संकेत ओळखा आणि एक्सरसाइज करायला सुरुवात करा. रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात आपल्याला एक्सरसाइज करायला वेळ मिळत नाही, पण दिवसातून थोडा तरी वेळ एक्सरसाइजसाठी काढायला पाहिजे. एक्सरसाइजमुळे आपण अनेक आजारांपासून दूर राहू शकतो. पाहूयात कुठली लक्षण दिसली की आपण्यास एक्सरसाइज करण्याची गरज आहे.

**हायबीपीचा त्रास–** सतत हायबीपीचा त्रास होत असेल, तर आता तुम्हाला एक्सरसाइज करण्याची वेळ आली आहे. एक्सरसाइज केल्याने तुम्हाला हलकं वाटेल. एक्सरसाइज केल्यामुळे तुम्हाला एनर्जी मिळेल. त्यामुळे तुमचे बीपी कंट्रोलमध्ये राहील.

**ॲसिडीटीचा त्रास–** जर तुम्हाला सतत ॲसिडीटीचा त्रास होत असेल, तर तुम्हाला एक्सरसाइज करण्याची गरज आहे. सतत ॲसिडीटी होणे म्हणजे तुम्हाला पोटाचे गंभीर आजार होण्याची शक्यता आहे. जर अशा वेळी तुम्ही एक्सरसाइज केली तर तुम्हाला याचा नक्की फायदा होईल. अनेक वेळा डॉक्टरसुद्धा ॲसिडीटीसाठी व्यायाम करण्याचा सल्ला देतात, पण कुठलीही गोष्ट करण्यापूर्वी आपल्या फॅमिली डॉक्टरचा सल्ला नक्की घ्या.

**स्किनमध्ये बदल–** आपल्या शरीरात होणाऱ्या बदलाकडे कायम लक्ष दिले पाहिजे. जर तुम्हाला घाम येणे बंद झाले असेल, तर हे संकेत आहे की तुम्हाला आता व्यायाम करायची गरज आहे. तुमचे शरीर आता थकले आहे. शरीरातून घाम बाहेर पडणे गरजेचे आहे. म्हणून अशा वेळी व्यायाम करून घाम काढला पाहिजे.

**तणाव वाढणे–** आजकाल कामाचा तणाव वाढला आहे. त्यामुळे सतत डोकेदुखी, पाय दुखणे, बॉडी पेनसारख्या गोष्टी त्रास देत असतात. या सगळ्यावर व्यायाम हा सगळ्यात चांगला उपाय आहे. व्यायाम केल्यामुळे तुम्हाला तणावमुक्त वाटेल. व्यायाम केल्यामुळे तुमचे शरीर हलके वाटेल आणि तुमची अनेक दुखणी कमी होतील.

**पाठ सतत दुखणे–** गेल्या दोन वर्षांत वर्क फ्रॉम होम सुरू आहे. त्यात सतत तासन्‌तास बसून काम सुरू आहे. त्यामुळे पाठदुखीची समस्या वाढली आहे. यावर एक रामबाण उपाय म्हणजे व्यायाम करा. व्यायाम केल्यामुळे तुमच्या शरीराच्या नसा मोकळ्या होतील. त्यामुळे पाठदुखीची समस्या दूर होईल.

**टीप : उपचार करण्यापूर्वी फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.**

# जिल्हा विकास आराखड्यातील केवळ २५ टक्केच निधी खर्च

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य शासनाकडून २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त झालेल्या रायगड जिल्हा विकास आराखड्यातील केवळ २५ टक्के निधी डिसेंबरपर्यंत खर्च झाला आहे. उर्वरित ७५ टक्के निधी तीन महिन्यात खर्च करण्याचे आव्हान शासकीय यंत्रणांसमोर आहे.

रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठक बुधवारी (दि. १२) पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे झाली. या बैठकीत सन २०२२-२३ चा प्रारूप आराखडा व सन २०२१-२२ अंतर्गत ११ जानेवारी २०२१ अखेरील खर्चाचा आढावा सादरीकरणाच्या माध्यमातून समितीसमोर मांडण्यात आला.

सन २०२२-२३ सर्वसाधारणसाठी २२५ कोटी ४४ लाख, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी २५ कोटी ६४ लाख, आदिवासी उपयोजनेसाठी ३४ कोटी सहा लाख रुपये अशा एकूण २८५ कोटी १४ लाख रुपयांच्या विकास आराखड्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

सन २०२१-२२ अंतर्गत सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजना या तीनही योजना प्रकारांसाठी ३३३ कोटी ६२ लाख निधी अर्थसंकल्पित करण्यात आला. हा सर्व निधी जिल्हा नियोजन समितीस प्राप्त झाला. ८५ कोटी ३५ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला असून डिसेंबर २०२१ अखेर २६ कोटी ६० लाख इतका निधी खर्च झाला आहे. प्राप्त निधीतील केवळ २५.५ टक्के इतका निधी खर्च झाला आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ करिता २७५ कोटी रुपये निधी अर्थसंकल्पित करण्यात आला. तो सर्व निधी जिल्हा नियोजन समितीस प्राप्त झाला. वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार एकूण तरतुदीपैकी ३० टक्के निधी कोविड १९ वरील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी राखीव ठेवण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त

**सन २०२२-२३ मध्ये सर्वसाधारणसाठी २२५ कोटी ४४ लाख, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी २५ कोटी ६४ लाख, आदिवासी उपयोजनेसाठी ३४ कोटी सहा लाख रुपये अशा एकूण २८५ कोटी १४ लाख रुपयांच्या जिल्हा विकास आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ९१ कोटी १५ लाख वाढीव निधीची मागणी करण्यात आली आहे. त्यास राज्यस्तरीय बैठकीत मान्यता घ्यावी लागेल.**

**-जयसिंग मेहत्रे, जिल्हा नियोजन अधिकारी, रायगड**

निधीपैकी ७० कोटी सहा लाख रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी डिसेंबर २०२१ अखेर १९ कोटी १८ लाख इतका निधी खर्च करण्यात आला. याचाच अर्थ डिसेंबरपर्यंत २५.५ टक्के निधी खर्च झाला आहे. सन २०२१-२२ मध्ये कोविड १९ अंतर्गत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेमधून आतापर्यंत २९ कोटी ८४ लाख इतका निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी २३ कोटी १५ लाख निधी वितरीत करण्यात आला आहे व डिसेंबर २०२१ अखेर १० कोटी ५९ लाख इतका निधी खर्च झाला आहे.

अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत २५ कोटी ६४ लाख निधी अर्थसंकल्पित करण्यात आला हा निधी प्राप्त झाला आहे. प्राप्त निधीपैकी नऊ कोटी ९३ लाख इतका निधी वितरित करण्यात आला आहे. त्यापैकी डिसेंबर २०२१ अखेर दोन कोटी सहा लाख इतका निधी खर्च करण्यात आला असून खर्चाची टक्केवारी ३८.७ इतकी आहे.

आदिवासी उपयोजनांतर्गत ३२ कोटी ९८ लाख निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. हा सर्व प्राप्त झाला असून पाच कोटी ३६ लाख निधी आतापर्यंत वितरित करण्यात आला आहे. त्यापैकी डिसेंबर २०२१ अखेर पाच कोटी ३६ लाख निधी खर्च करण्यात आला.

राज्य शासनाकडून डिसेंबर महिन्यात निधी प्राप्त झाला. हा निधी मार्च २०२२ पर्यंत खर्च करावा लागणार आहे अन्यथा उर्वरित निधी परत करावा लागेल. मागील वर्षी ३० कोटी रुपये परत करावे लागले होते. निधी खर्च करण्यासाठी तांत्रिक बाबी पूर्ण कराव्या लागतात. त्यासाठी वेळ लागणार आहे. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे तीन महिन्यात उर्वरित निधी खर्च करण्याचे आव्हान शासकीय यंत्रणेसमोर आहे.

# शहरातील गोडाऊन अन्यत्र हलवावे

## म्हसळाकरांची मागणी अद्यापही लालफितीत

**म्हसळा : प्रतिनिधी**

शहरातील नागरी वस्तीत शासकीय धान्य गोडाऊन असून ते अन्यत्र हलवावे किंवा गोदामाला अन्य मार्गाने रस्ता द्यावा, अशी मागणी म्हसळ्याच्या पहिल्या नगराध्यक्षांनी केली होती, मात्र ही मागणी महसूल विभागाने अजूनही अनुत्तरित ठेवली आहे.


(छाया : संजय खांबेटे)

म्हसळ्यातील कन्याशाळा परिसरांत ५० ते ५२ वर्षापूर्वी अन्न नागरी पुरवठा विभागाने शासकीय गोडाऊन उभारले आहे. तालुक्यातील नागरिकांना शासनाकडून येणारे धान्य साठा करणे व वितरण करणे यासाठी हे गोडाऊन बांधले आहे. तत्कालीन परिस्थितीत आवश्यक असणारा गोदामाचा जोडरस्तासुद्धा करण्यात आला आहे. नागरी वस्तीतून जाणाऱ्या या रस्त्यावर आता नगरपंचायत प्रशासनाने सुमारे एक कोटी रुपये खर्च केले आहेत. एकतानगर, लवासा, मातोश्री पार्क, विद्यानगरी, रोहिदासनगर, वाळवटकर कॉम्प्लेक्स, शंकर मंदिर या परिसरातील नागरिकांच्या रहदारीच्या या रस्त्यावरून शासकीय गोदामाचे धान्य घेऊन येणाऱ्या गाड्या ये-जा करीत असतात. त्यामुळे या रस्त्यासाठी खर्च केलेला निधी पाण्यात जाणार आहे. शाळा, अंगणवाडी आणि ग्रामदेवता धावीर मंदिर, राधाकृष्ण मंदिर, हनुमान मंदिर, गणेश मंदिर, शंकर मंदिर, अक्कलकोट स्वामी मंदिर अशी सहा मंदिरे याच मार्गावर आहेत.

पुरवठा विभागाच्या शिधापत्रिका धारकांना असणाऱ्या विविध योजना अंर्तगत तालुक्यात मासिक ५०० ते ६०० मे.टन (तांदूळ, गहू, साखर, डाळी, खाद्यतेल) येत असते. ते धान्य तालुक्यातील ८२ गावांमधील ४० ते ४५ रास्त भाव धान्य दुकानांमार्फत वितरण करण्यात येते. त्यामुळेच या मार्गावर सतत क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहतूक होत असते. अवजड वाहनांचा त्रास साने आळी व अन्य घरांना होत असतो.

**शासकीय गोदामाचा या परिसरांतील जनतेला त्रास होत असल्याने आम्ही गोडाऊन या भागातून अन्यत्र हलवावे, अशी मागणी केली आहे, शासनाने त्या जागी तहसील कार्यालय किंवा अन्य शासकीय कार्यालय बांधावे.**

**-मंगेश म्हशीलकर, रहिवासी, म्हसळा**

**गोडाऊन या भागातून अन्यत्र हलविणेबाबत शासनाचे धोरण प्रस्तावित आहे.**

**-समीर घारे, तहसीलदार, म्हसळा**

## ट्रकची दुचाकीला धडक; दोन जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव-म्हसळा रस्त्यावरील मोर्बा गावाच्या हद्दीत गुरुवारी (दि. १२) दुपारी भरधाव ट्रकने विरुद्ध दिशेला जाऊन दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील दोघे जण जखमी झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

शांताराम चंदर जाधव (वय ५२; रा. नाणोरे आदिवासीवाडी, ता. माणगाव) हे गुरुवारी दुपारी दुचाकी (एमएच ०६, बीके ८७२९) चालवीत सकलप म्हसळा येथे जात होते. मोर्बा गावाच्या हद्दीत म्हसळा बाजूकडून येणाऱ्या ट्रक (एमएच १२ केपी ४०३१) ने विरुद्ध दिशेला जाऊन त्यांच्या दुचाकीला ठोकर दिली. या अपघातात दुचाकी चालक शांताराम जाधव आणि त्यांच्या पाठीमागे बसलेला त्यांचा पुतण्या रामदास दत्ताराम जाधव (वय २७) हे दोघे जखमी झाले. दुचाकीचेही मोठे नुकसान झाले.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास सहाय्यक फौजदार जितेंद्र वाटवे करीत आहेत.

# पाली येथील अंबा नदीत मेलेल्या कोंबड्या व मासे

**पाली : प्रतिनिधी**

पालीतील अंबा नदी पुलाजवळ नदीपात्रात मोठ्या प्रमाणात मेलेल्या कोंबड्या व मासळी टाकलेली आढळली. त्यामुळे नदीचे पाणी दूषित झाले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सुधागड तालुक्यातील पाली गावाला पाणीपुरवठा करणारी अंबा नदी प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. कधी कारखान्याचे दूषित पाणी, तर कधी घाण व केरकचरा यामुळे नदी प्रदूषित होतेय, अशातच आता काही मच्छी व चिकन व्यावसायिक न विकली गेलेली सडलेली मासळी व मेलेल्या कोंबड्या रात्रीच्या वेळी नदीत फेकून देतात. नदीचे पाणी बंधारा बांधून अडविण्यात आले आहे. परिणामी या मेलेल्या कोंबड्या व मासळी नदीपात्रात तिथेच पडून राहते व सडते. त्यामुळे पाणी दूषित होत आहे. हेच पाणी कोणतीही प्रक्रिया न करता पालीकरांना पुरविले जाते. परिणामी रोगराई पसरण्याचा धोकादेखील आहे.


(छाया : धम्मशील सावंत)

**नगरपंचायतीच्या माध्यमातून या दुकानदारांना नोटीस पाठविण्यात येईल. कोणीही अशा प्रकारे नदीचे पाणी दूषित करू नये.**

**-दिलीप रायण्णावार, तहसीलदार, पाली, सुधागड**

# प्रदेश युवक काँग्रेसचा सरचिटणीस उमेश ठाकूरसह दोन साथीदारांना बेड्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

आपल्या अवैध रेती व्यवसायाबाबत तक्रारी करणाऱ्याची बदनामी करण्याच्या हेतूने त्याच्या नावाने बनावट फेसबुक अकाऊंट उघडून त्यावरून महिलेला अश्लील व्हिडीओ आणि मेसेजेस पाठवल्याप्रकरणी प्रदेश युवक काँग्रेसचा सरचिटणीस अ‍ॅड. उमेश ठाकूर याला अलिबाग पोलिसांनी अटक केली आहे. उमेश ठाकूर रुग्णालयात दाखल असून त्याची मेडिकल कस्टडी घेण्यात आली आहे.

अ‍ॅड. उमेश ठाकूर हे रेतीचा व्यवसाय करतात. धरमतर खाडीतील त्यांच्या अवैध रेती उत्खननासंदर्भात पेण तालुक्यातील कोलेटी येथील काशिनाथ ठाकूर वेगवेगळ्या कार्यालयात तक्रारी करत असत. त्यामुळे अ‍ॅड. ठाकूर यांना व्यवसायात मोठे नुकसान होत होते. आपल्या विरोधातील तक्रारीने अ‍ॅड. ठाकूर हैराण झाले होते. त्यांनी काशीनाथ ठाकूर यांचा काटा काढण्याचा बेत आखला. शुभम गुंजाळ यांच्या मदतीने काशीनाथ ठाकूर यांच्या नावाचे बनावट फेसबुक अकाऊंट तयार केले व आपल्याच ओळखीतील मनीषा चोरडेकर हिला त्यावरून अश्लील व्हिडीओ व मेसेजेस पाठवले.

या व्हिडीओ आणि मेसेजच्या आधारे मनीषा चोरडेकर हिने काशीनाथ ठाकूर यांच्या विरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. तपासीक अमलदार पोलीस निरीक्षक शैलेश सणस यांनी सायबर सेलची मदत घेण्याचे ठरवले. सायबर सेलने केलेल्या तपासात शुभम गुंजाळ हा या गुन्ह्यात सहभागी असल्याचे निष्पन्न झाले. त्याची सखोल चौकशी केली असता अ‍ॅड. उमेश ठाकूर हा या कटाचा सूत्रधार असल्याचे समोर आले. महत्त्वाचे म्हणजे ज्या महिलेने तक्रार दिली होती, ती मनीषा चोरडेकर या कटात सहभागी होती.

अलिबाग पोलिसांनी अ‍ॅड. उमेश ठाकूर, शुभम गुंजाळ आणि मनीषा चोरडेकर या तिघांनाही अटक केली आहे. प्रकृती बिघडल्याच्या कारणावरून उमेश ठाकूर रुग्णालयात दाखल झाला आहे. त्याची मेडिकल कस्टडी घेण्यात आली आहे, तर उर्वरित दोघांना १४ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# पोलिसांशी हुज्जत घालणे पडले महागात

## पालीत वाहतुकीचे नियम मोडणाऱ्याला पाच हजाराचा दंड

**पाली : प्रतिनिधी**

पोलिसांबरोबर हुज्जत घालणाऱ्या वाहनचालकाला पाली येथील कनिष्ठ न्यायालयाने पाच हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. त्यामुळे वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पालीसह सुधागड तालुक्यात वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांची तपासणी सुरू आहे. यादरम्यान वाहनचालकांची कागदपत्रे व लायसन्स तपासले जात आहेत. पाली-खोपोली मार्गावरील गणेश हॉटेलजवळ बिरप्पा कलप्पा पुजारी (वय ३८) हा आपल्या ताब्यातील दुचाकी (एमएच १२ आरव्ही ७३७९) चालवित होते. पोलिसांनी त्यांच्याकडे कागदपत्रे व लायसन्स मागताच त्याने पोलिसांशी हुज्जत घातली. त्यामुळे पोलिसांनी बिरप्पा पुजारी यांना पाली येथील कनिष्ठ न्यायालयात हजर केले. या वेळी न्यायालयाने पुजारी याला पाच हजाराचा दंड ठोठावला.


(छाया : धम्मशील सावंत)

# पेणमध्ये कोरोनाचा वेगाने प्रसार

## रुग्णसंख्या ३००च्या पार

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या आठवडाभरात कोरोनाचा प्रसार झपाट्याने झाला असून रुग्णसंख्येने ३००चा टप्पा पार केला आहे. वेळोवेळी सूचना देऊनही नागरिक नियमांची पायमल्ली करताना दिसत आहेत. प्रशासनाने आता राजकीय व सामाजिक कार्यक्रमांना आवर घालण्याची गरज आहे.

पेण तालुक्यात बुधवारी (दि. १२) कोरोना रुग्णसंख्या ११२ने वाढली असून एकूण रुग्णसंख्या ३६१वर गेली आहे, तर एका आठवड्यात कांदळेपाडा येथील ६३ वर्षीय व वडगाव येथील ४० वर्षीय पुरुष अशा दोन व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

# पेणमध्ये ऑन ड्यूटी २४ तास पथनाट्य सादर

**पेण : प्रतिनिधी**

रेझिंग डे सप्ताहानिमित्त नुकतीच पेण बसस्थानक व वीर हुतात्मा भाई कोतवाल चौक येथे ऑन ड्युटी चोवीस तास या पथनाट्यातून पोलीस विभागाच्या कार्याची माहिती देण्यात आली.

रायगड पोलीस दलातर्फे २ ते ८ जानेवारी या कालावधीत रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने पोलीस काका, पोलीस दीदी, ११२ मदतकार्य क्रमांक, बीट मार्शल, दमिनी पथक, पोलीस मित्र याविषयी जनतेला माहिती व्हावी, तसेच सायबर क्राईम होऊ नये यासाठी कोणती दक्षता घ्यावी याविषयी माहिती देण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून पेण बसस्थानक व वीर हुतात्मा भाई कोतवाल चौक येथे ऑन ड्युटी चोवीस तास हे पथनाट्य सादर करण्यात आले. या वेळी पेण पोलीस ठाण्याचे अधिकारी, पोलीस बँडपथक व नागरिक उपस्थित होते.

प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी या पथनाट्याचे नेतृत्व करीत असून सदर पथनाट्यात विनोद नाईक, अमृता शेडगे, प्रसाद अमृते, सागर पाटील, तुषार राऊळ, धनश्री मोरे, निशिता पाटील, मानसी पाटील, मानसी पोसरेकर, श्रीराम जांभळे आदी कलाकार सहभागी झाले होते.

या वेळी उपस्थित नागरिकांना कोरोनाचा प्रादूर्भाव वाढू नये यासाठी मास्कचा वापर करा, सामाजिक अंतर पाळा व नियमित आपले हात साबणाने स्वच्छ धुवा अथवा सॅनिटाईज करा, असे आवाहनदेखील करण्यात आले.


(छाया : अनिस मनियार)

# दरडग्रस्त साखर सुतारवाडीत ढिगाऱ्याखाली सापडले दागिने


(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दरडग्रस्त साखर सुतारवाडीत आपत्ती निवारणाचे काम सुरू असताना घर वाहून गेलेले लक्ष्मण नारायण सुतार यांच्या पत्नीचे काही दागिने ढिगाऱ्याखाली सापडले. सरपंच पांडुरंग सुतार व काही जबाबदार ग्रामस्थांनी ते दागिने बाधित कुटुंबाच्या स्वाधीन केले.

पोलादपूर तालुक्यातील साखर सुतारवाडी येथे २२ जुलैच्या रात्री अतिवृष्टीदरम्यान दरड कोसळल्याची दुर्घटना घडली होती. त्यात २३ घरे गाडली गेली, तर सहा व्यक्तींना प्राण गमवावा लागला होता.

पोलादपूर तहसीलदार यांच्या माध्यमातून साखर सुतारवाडीत आपत्ती निवारणाचे काम सुरू असताना लक्ष्मण नारायण सुतार यांच्या पत्नीचे काही दागिने ढिगाऱ्याखाली सापडले. सरपंच पांडुरंग सुतार व काही ग्रामस्थांनी ते दागिने बाधित कुटुंबाच्या स्वाधीन केले. त्या वेळी लक्ष्मण सुतार कुटुंबीयांच्या डोळ्यात आश्रू आले.

# बारसगावातील शेतकऱ्यांना भुईमूग बियाणांचे वाटप

**रोहा : प्रतिनिधी**

केकेव्हीयन्स वसुंधरा फाउंडेशन या सेवाभावी संस्थेतर्फे सोमवारी (दि. ३) महाड तालुक्यातील बारसगाव येथील पूरबाधीत शेतकऱ्यांना भुईमूग बियाणांचे वाटप करण्यात आले.


(छाया : महादेव सरसंबे)

दापोली कृषी विद्यापीठातील १९९१ ते १९९५ या कालावधीतील माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन केकेव्हीयन्स वसुंधरा फाउंडेशन ही सेवाभावी संस्था स्थापन केली आहे. या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी बारसगाव येथील शेतकऱ्यांना रब्बी-उन्हाळी हंगामासाठी भुईमूग बियाणे उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला आणि सोमवारी त्याचे वाटप केले. या वेळी शेतकरी नारायण बाबू उतेकर यांच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात कोकण कृषी विद्यापीठाच्या किल्ला-रोहा येथील कृषी विज्ञान केंद्रातील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. मनोज तलाठी यांनी भुईमूग लागवड, मशागत, पाणी व खत व्यवस्थापन, आंतरमशागत याविषयी सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले.

संस्थेचे उपाध्यक्ष उमेश कदम यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला आणि जमिनीचे आरोग्य व त्याचा उत्पन्नाशी असलेला संबंध, कीड व रोग नियंत्रण याविषयी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश राऊत, सेक्रेटरी राजेंद्र कामत, खजिनदार अमित वालावलकर, सदस्य उदय मयेकर, भीमराज भाजीपाले यांनीही उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर शिवार फेरीच्या माध्यमातून परिसरातील गांडूळ निर्मिती प्रकल्प, भाजीपाला लागवड प्रक्षेत्र यांना भेट देऊन शेतकऱ्यांना सरी वरंबा पद्धतीचा अवलंब करण्याचा सल्ला देण्यात आला. संस्थेचे सदस्य देवेंद्र शिर्के, बारसगाव परिसरातील शेतकरी आणि महिला या वेळी उपस्थित होत्या.













उरण : प्रकल्पग्रस्तांना मान व स्थान मिळवून देणारे दिवंगत दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त जन्मभूमी जासई येथील जिजामाता रुग्णालयात बसविण्यात आलेल्या 'दिबां'च्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण त्यांच्या लढावू सहकारी व कोल्हापूरच्या माजी नगरसेविका भारतीताई पोवार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार मनोहर भोईर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, संतोष केणे, माजी उपमहापौर व स्थायी समिती सदस्य जगदिश गायकवाड, कामगार नेते सुरेश पाटील, भूषण पाटील, 'दिबां'चे सुपुत्र अतुल पाटील, जे. डी. तांडेल, सीमा घरत आदी उपस्थित होते.



उरण : प्रकल्पग्रस्तांचे अध्वर्यु दिवंगत दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांची जन्मभूमी असलेल्या जासई येथील पूर्णाकृती पुतळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी उपमहापौर व स्थायी समिती सदस्य जगदिश गायकवाड, कामगार नेते सुरेश पाटील आदींनी अभिवादन केले.



उलवे नोड : केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले गुरुवारी भूमिपुत्र निर्धार परिषदेसाठी पनवेल तालुक्यातील कोल्ही कोपर येथे आले होते. या वेळी त्यांनी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला भेट दिली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. माजी उपमहापौर व स्थायी समिती सदस्य जगदिश गायकवाड सोबत होते.

## अभिवादन!






पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दिवंगत दि. बा. पाटील यांना जयंतीनिमित्त त्यांच्या संग्राम निवासस्थानी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, 'दिबां'च्या लढावू सहकारी व कोल्हापूरच्या माजी नगरसेविका भारतीताई पोवार, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर व स्थायी समिती सदस्य जगदिश गायकवाड, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, नगरसेवक तेजस कांडपिळे, ओबीसी नेते जे. डी. तांडेल आदींनी अभिवादन केले. या वेळी 'दिबां'चे सुपुत्र अभय पाटील, अतुल पाटील व कुटुंबीय उपस्थित होते.



पनवेल : भूमिपुत्रांची अस्मिता जपणारे दिवंगत दि. बा. पाटील यांना आगरी समाज मंडळाच्या सभागृहात जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर व स्थायी समिती सदस्य जगदिश गायकवाड यांच्यासह आगरी समाज मंडळाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे कैवारी दिवंगत दि. बा. पाटील यांची जयंती तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात साजरी करण्यात आली. या वेळी तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, नगरसेवक तेजस कांडपिळे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून 'दिबा'साहेबांना अभिवादन केले.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com